महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ०७ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### उन्हाळ्या आधीच पाण्याची टंचाई

उन्हाळा अजून पूर्णपणे सुरू झालेला नाही, तरी राज्यातील अनेक भागांत पाण्याच्या टंचाईच्या बातम्या समोर येऊ लागल्या आहेत. टँकरची चर्चा, पाणीकपात, आटत चाललेले जलस्रोत आणि चिंतेत पडलेले नागरिक हे चित्र नवीन नाही. दरवर्षी उन्हाळा येणार हे माहीत असतानाही पाण्याची टंचाई इतक्या लवकर जाणवू लागणे, हे निसर्गापेक्षा व्यवस्थेच्या अपयशाकडे अधिक बोट दाखवणारे आहे. पाण्याच्या टंचाईमागे हवामान बदल, अपुरा पाऊस ही कारणे नाकारता येणार नाहीत. मात्र सर्व दोष निसर्गावर ढकलून प्रशासन स्वतःची जबाबदारी झटकू शकत नाही.

पावसाचे पाणी साठवण्यात होत असलेले अपयश, गाळाने भरलेले तलाव व धरणे, गळतीमुळे वाया जाणारे पाणी आणि भूजलाचा अमर्याद उपसा या मानवनिर्मित कारणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. योजना आहेत, पण त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसत नाही. दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की प्रशासन जागे होते. बैठका होतात, टँकर सुरू होतात आणि तात्पुरत्या उपायांनी परिस्थिती सावरली जाते. पावसाळा आला की पाणीप्रश्न पुन्हा विसरला जातो. ही प्रक्रिया म्हणजे समस्येवर उपचार नव्हे, तर फक्त वेळकाढूपणा आहे. पाणीटंचाई हा आपत्कालीन नव्हे, तर नियोजनाचा विषय आहे, हे अजूनही गांभीर्याने स्वीकारले जात नसल्याचे चित्र आहे.

शहरी भागात मोठ्या प्रमाणावर पाणी गळतीमुळे वाया जाते, तर ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे अर्धवट राहतात. जलयुक्त शिवारसारख्या योजनांचा गवगवा झाला, पण अनेक ठिकाणी त्याचा अपेक्षित परिणाम दिसून आला नाही. लोकसहभाग, देखभाल आणि जबाबदारी यांचा अभाव ही या अपयशाची मुख्य कारणे ठरत आहेत. पाणी ही सुविधा नाही, तर नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. शिक्षण, आरोग्य, शेती आणि उद्योग सगळेच पाण्यावर अवलंबून आहेत. तरीही जर लोकांना उन्हाळयाच्या सुरुवातीलाच पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर तो व्यवस्थेचा पराभव मानला पाहिजे. टँकर वाढवणे हा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. आजच ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्या परिस्थिती अधिक गंभीर होईल. पाण्याची टंचाई ही नैसर्गिक आपत्ती नसून, मानवनिर्मित बेपर्वाई आहे. ही बेपर्वाई बदलली नाही, तर दरवर्षी उन्हाळा येण्याआधीच पाण्याच्या टंचाईची चर्चा सुरू होत राहील, आणि त्याची किंमत सामान्य नागरिकांनाच मोजावी लागेल.

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी आज मतदान

## प्रशासकीय यंत्रणा सज्ज ■ सोमवारी मतमोजणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ७**

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांसाठी आज, शनिवारी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदार आपला हक्क बजावू शकणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे जाहीर झालेल्या राष्ट्रीय दुखवट्यानंतर मतदानाची ही नवी तारीख निश्चित करण्यात आली आहे.

**■ निवडणुकीचे रणांगण आणि उमेदवार**

या सार्वत्रिक निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी मतदान होत आहे. निवडणुकीत एकूण ७,४३८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. यापैकी जिल्हा परिषदेच्या जागांसाठी २,६२४, तर पंचायत समित्यांसाठी ४,८१४ उमेदवार मैदानात उतरले आहेत. महिलांसाठी राखीव जागांची संख्या लक्षणीय असून जिल्हा परिषदेत ३६९ आणि पंचायत समित्यांमध्ये ७३१ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय अनुसूचित जाती, जमाती तसेच नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित जागांवरही चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.

**■ या जिल्ह्यांमध्ये मतदान**

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांमध्ये आज मतदान पार पडणार आहे.

**■ मतदानाची वेळ व निकाल**

मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी निश्चित करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोमवारी, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार असून त्यानंतर निकाल जाहीर होतील व आचारसंहिता संपुष्टात येईल.

# काळू धरणासाठी प्रशासन पुन्हा मैदानात

## ग्रामसभांद्वारे भूसंपादनाला पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ६**

**बदलापूर :** भविष्यातील महानगरांची पाण्याची तहान भागवण्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या काळू धरणाच्या उभारणीतील अडथळे दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासन पुन्हा एकदा सज्ज झाले आहे. यापूर्वी झालेल्या ग्रामसभांमध्ये धरणाच्या कामाला ग्रामस्थांनी विरोध दर्शविल्यानंतर, आता खासगी जागा थेट वाटाघाटीद्वारे भूसंपादित करण्यासाठी प्रशासनाने पुन्हा ग्रामसभांचा मार्ग निवडला आहे. २५ फेब्रुवारीपासून या ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून ग्रामस्थांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मात्र भूसंपादनासाठी ग्रामस्थांचा पाठिंबा न मिळाल्यास काळू धरणाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता आहे.

एका तपाहून अधिक काळ रखडलेल्या काळू धरणाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या धरणाच्या कामाचा आढावा घेतला होता. मात्र, धरण उभारणीसाठी आवश्यक असलेल्या ग्रामपंचायतींच्या 'ना हरकत' परवानगीत ग्रामस्थांनी विरोध दर्शविल्याने प्रकल्प अडचणीत आला होता. त्यामुळे काही काळ या धरणाचे भवितव्य अंधारात गेल्याची चर्चा होती. आता पुन्हा एकदा या धरणाच्या उभारणीसाठी शासकीय स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. या प्रकल्पासाठी वन विभागाच्या ९९ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून, सुमारे १,२६० हेक्टर खासगी जागाही संपादित करावी लागणार आहे. ही खासगी जमीन थेट वाटाघाटीद्वारे संपादित करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. त्यासाठी महसूल प्रशासनाच्या माध्यमातून संबंधित गावांमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात येत आहे.

**■ अशा होणार ग्रामसभा**

२५ फेब्रुवारी रोजी करचोंडे (कुडशेत) आणि जडई, २६ फेब्रुवारी रोजी भोरांडे (फांगणे) आणि दिवाणपाडा, २७ फेब्रुवारी रोजी भोरांडे आणि उदळडोह, २ मार्च रोजी तळेगाव आणि तळेगाव (खरशेत उमरोली), ४ मार्च रोजी फांगुळगव्हाण आणि माळ, ५ मार्च रोजी दिघेफळ आणि वैशाखरे, ६ मार्च रोजी फांगळोशी, ९ मार्च रोजी न्याहाडी आणि खुटल बारागाव, १० मार्च रोजी मोरोशी आणि झाडघर, ११ मार्च रोजी चासोळे आणि आंबिवली अशा १९ ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे.

# मुंबई महापालिकेत शरद पवार गटाच्या एकमेव नगरसेवकाचा महायुतीला पाठिंबा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ०६**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्यासोबत निवडणूक लढविणाऱ्या शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकाकडून आता महायुतीला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली जाणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. शरद पवार गटाचा मुंबईतील एकमेव नगरसेवक अजित रावराणे हे महायुतीसोबत हतमिळवणी करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

मुंबई महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचा हा एकमेव नगरसेवक असून, त्यांनी महायुतीला समर्थन देण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. यामुळे महापालिकेतील सत्तासमीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दरम्यान, मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देण्यासाठी एकत्र येण्याची शक्यता असून, आगामी काळात महापालिकेत महायुतीची ताकद वाढताना दिसू शकते. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून दि. ०७ फेब्रुवारी रोजी महापौरपदासाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. तर दि. ११ फेब्रुवारी रोजी मुंबई महापालिकेच्या महापौरपदाची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील राजकीय घडामोडींना अधिक वेग येण्याची शक्यता आहे. महापलिका निवडणुकीत भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना युतीला काठावरचे बहुमत मिळाल्याने वैधानिक समित्यांवरील बहुमत डळमळीत झाले आहे. यासाठी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून अन्य पक्षांतील नगरसेवकांचा पाठिंबा मिळवण्याचे जोरदार प्रयत्न होत आहेत. हा पाठिंबा मिळाल्यास स्थायी समितीत ठाकरे यांच्या शिवसेनेला फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यांचा एक सदस्य कमी होऊन सत्ताधारी पक्षाचा एक सदस्य वाढवण्याच्या हालचालींना वेग आला होता. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक अजित रावराणे यांना गळाला लावत शिंदे यांच्या शिवसेनेची सरशी झाली आहे.

**दरम्यान, आगामी काळात होत असलेल्या मुंबई महानगरपालिकेतील महापौर आणि उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. 11 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या निवडणुकीआधी सर्वच पक्षांनी आपल्या नगरसेवकांना मुंबईतच थांबण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. कोणत्याही परिस्थितीत मतदानाच्या आधी शहर सोडू नये, असे आदेश देण्यात आले आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे स्पष्ट बहुमत नसतानाही त्यांनी खबरदारीचा पवित्रा घेत नगरसेवकांना 15 फेब्रुवारीपर्यंत मुंबई सोडू नका, असे निर्देश दिले आहेत.**

# "लाडक्या बहिणींना दिलासा! e-KYC साठी मुततवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ६**

**मुंबई : तांत्रिक कारणांमुळे गेल्या काही दिवसांपासून बंद असलेले 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे ई-केवायसी (e-KYC) पोर्टल आजपासून पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहे. पोर्टल बंद असल्याने राज्यातील हजारो महिलांचे अर्ज प्रलंबित राहिले होते आणि त्यांचे हप्ते रखडले होते. पोर्टल बंद असल्यामुळे संतापलेल्या महिलांनी राज्याच्या विविध भागांत मोर्चे काढून आपला रोष व्यक्त केला होता. या आंदोलनांची आणि महिलांच्या वाढत्या आक्रोशाची गंभीर दखल घेत राज्य महिला व बालविकास विभागाने तातडीने पोर्टल सुरू करण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकारी स्तरावर या अर्जांची प्रत्यक्ष पडताळणी सुरू असली, तरी प्रक्रियेला वेग देण्यासाठी शासनाने आता ऑनलाईन दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.**




**"लाडक्या बहिणींना दिलासा!**

प्रलंबित ई-केवायसी (e-KYC) पोर्टल अखेर पुन्हा सुरू. गेल्या काही दिवसांपासून तांत्रिक कारणांमुळे पोर्टल बंद असल्याने हजारो महिलांचे हप्ते रखडले होते. महिलांचा आक्रोश आणि वाढत्या दबावानंतर राज्य महिला व बालविकास विभागाने तातडीने आदेश देऊन हे पोर्टल पूर्ववत केले आहे. आता प्रलंबित लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे."

## ■ ३१ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत

ज्या महिलांच्या अर्जात 'कुटुंबातील सदस्य सरकारी कर्मचारी असणे किंवा निवृत्तीवेतन घेणे' या पर्यायाबाबत चूक झाली आहे, अशा महिलांना ३१ मार्च २०२६ पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर जाऊन दुरुस्ती करता येणार आहे.

**■ शासनाचे स्पष्ट निर्देश**

ही दुरुस्ती करण्याची अंतिम संधी असून, यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. यासाठी पोर्टलवर आवश्यक तांत्रिक बदल करण्यात आले आहेत. अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पात्र महिलांनी आपला लाभ सुरू ठेवण्यासाठी वेळेत e-KYC मधील करून घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.




## थोडक्यात महत्वाचे

### अपघाती मृत्यूंसाठी खड्डे नव्हे, चालकांची बेदरकारी कारणीभूत

**ठाणे महापालिकेचा उच्च न्यायालयात दावा**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ७**

**ठाणे :** ठाण्यातील बहुतांशी अपघाती मृत्यू हे रस्त्यांवरील खड्डे किंवा खराब स्थितीमुळे नसून, वाहन चालकांच्या बेदरकार व निष्काळजी वाहनचालना यामुळे झाल्याचा दावा ठाणे महापालिकेने नुकताच मुंबई उच्च न्यायालयात केला आहे. ठाण्यात खड्ड्यांमुळे अनेक मृत्यू झाल्याच्या बातम्यांची न्यायालयाने दखल घेतल्यानंतर महापालिकेला स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. ठाणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत सोनग्रा यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात, रस्ते अपघातांमुळे होणारे मृत्यू व दुखापतींच्या प्रकरणात नुकसानभरपाई निश्चित करण्यासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार समिती स्थापन करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, अपघातांची कारणमीमांसा करताना प्रत्येक प्रकरणात सखोल तपास करण्यात येत असल्याचा दावाही महापालिकेने केला आहे.

प्रतिज्ञापत्रात १३ जुलै २०२५ रोजी झालेल्या अपघाताचा संदर्भ देण्यात आला आहे. कासारवडवली पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या या गुन्ह्यात, अपघात रस्त्यावरील खड्डयांमुळे नसून संबंधित वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या घटनेचा तपशील १८ सप्टेंबर २०२५ रोजी दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे आधीच न्यायालयासमोर मांडण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, १३ जुलै २०२५ रोजी २१ वर्षांच्या तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद आहे. हा अपघात रात्री १० वाजण्याच्या सुमारास नागला बंदर परिसरात झाला होता. एका अज्ञात वाहनाने दुचाकीला मागून धडक दिल्यामुळे संबंधित तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

# शहापुरातील झेडपी शाळा वर्षभर अंधारात

## मनसे नेते अविनाश जाधव यांची प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. ६**

**शहापूर :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील खरम्याचा पाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या शाळेत तब्बल गेल्या १ वर्षापासून वीजपुरवठा नसल्याने विद्यार्थ्यांना अंधारात शिक्षण घ्यावे लागत आहे. या गंभीर प्रकाराबाबत मनसे नेते अविनाश जाधव यांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शहापूर तालुक्यातील काही जिल्हा परिषद शाळांबाबत स्थानिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर अविनाश जाधव यांनी खरम्याचा पाडा येथील शाळेला प्रत्यक्ष भेट दिली. या शाळेत एकूण ३९ विद्यार्थी शिक्षण घेत असून, केवळ २ वर्गखोल्यांमध्ये अध्यापन सुरू आहे. एका वर्गात इयत्ता तिसरी ते पाचवीचे विद्यार्थी, तर दुसऱ्या वर्गात उर्वरित इयत्तांचे विद्यार्थी बसवले जात असल्याचे पाहणीदरम्यान स्पष्ट झाले.

**■ फक्त थकीत १,५०० च्या वीजबिलामुळे एखादी शाळा पूर्ण वर्ष अंधारात ठेवली जाते, हे प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचं जिवंत उदाहरण आहे. आपण डिजिटल इंडिया, स्मार्ट क्लास, नवीन शिक्षण धोरण अशा मोठ्या गोष्टी बोलतो, पण प्रत्यक्षात मुलांना दिवा-पंखाही मिळत नसेल तर ते सगळं ढोंग ठरतं. शहापुरासारख्या आदिवासी-दुर्गम भागातली शाळा म्हणजे त्या गावाचं भविष्य असतं. तिथे स्मार्ट टीव्ही आहे पण वीज नाही विद्यार्थी आहेत पण बेंच नाहीत शिक्षणाचा हक्क आहे पण सुविधा नाहीत याला प्रशासनाचं आणि शिक्षण विभागाचं अक्षम्य दुर्लक्षच म्हणावं लागेल**

फक्त १,५०० रुपयांचे वीजबिल थकीत राहिल्यामुळे गेल्या १ वर्षापासून शाळेचा वीजपुरवठा खंडित असल्याची बाब उघडकीस आली. शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट टीव्हीची सुविधा उपलब्ध असतानाही वीज नसल्याने ती पूर्णपणे निरुपयोगी ठरत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असल्याचे चित्र आहे.

याशिवाय शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आवश्यक बेंचची कमतरता, गणवेश व दप्तरांचा अभाव असल्याचेही समोर आले आहे. या संपूर्ण परिस्थितीचे चित्रीकरण करून मनसे नेते अविनाश जाधव यांनी ते समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केले असून, संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



# गजानन महाराज प्रकट दिन

गजानन महाराज हे महाराष्ट्रातील एक संत होते. महाराष्ट्रातील शेगाव हे स्थान गजानन महाराजांमुळे नावारूपाला आले आहे.

गजानन महाराज यांचा जन्म कधी झाला हे माहीत नाही परंतु ते पहिल्यांदा त्यांच्या तरुण वयात शेगावात माघ महिन्यात वद्य सप्तमी दिवशी अर्थातच शके १८०० म्हणजेच २३ फेब्रुवारी १८७८ रोजी सर्वप्रथम प्रकटले. या दिवशी सुमारे ३० वर्षाचे गजानन महाराज दिगंबरावस्थेत प्रथम दृष्टीस पडले. त्या वेळी ते देवीदास पातुरकरांच्या मठाबाहेर उष्ट्या पत्रावळीतील शिते उचलून खात होते आणि गाईगुरांना पिण्यास ठेवलेल्या ठिकाणचे पाणी पित असताना बंकटलाल अग्रवाल यांना सर्वप्रथम दृष्टीस पडले.

त्यांचे भक्त ही तिथी गजानन महाराज प्रकट दिन म्हणून साजरी करतात. सुमारे ३२ वर्षे गजानन महाराजांनी भक्तजनांना येथून मार्गदर्शन केले.

"गण गण गणात बोते" हा त्यांचा आवडता मंत्र ज्याचा ते अखंड ते जप करित. हे अहर्नीश त्यांचे भजन चालत असे त्यामुळे भक्तांनी त्यांना श्री गजानन महाराज हे नाव दिले. ह्या मंत्राचा अर्थ असा आहे की जीव आणि ब्रह्म हे एकच आहेत आणि त्यांना निराळे समजू नये.

गजानन महाराजांना झुणका भाकरी, मुळ्याच्या शेंगा, हिरव्या मिरच्या, अंबाडीची भाजी, पेढे, खिचडी, पिठीसाखर आणि चहा अतिशय आवडत असत. कधी कधी ते अमर्यादपणे खायचे तर कधी तीन-चार दिवस उपाशी राहावे अशी त्यांची रीत होती. भक्तांकडून येणाऱ्या ताटात पक्वान असो भाकरी आणि ठेचा असो ते प्रसन्न भावाने सेवन करयाचे. भक्ताच्या आग्रह खातीर त्यांनी चिलीम ओढण्यास सुरुवात केली असली तरी त्यांना चिलीम ओढण्याचीही फारशी सवय नव्हती. ते क्वाचितच चिलीम ओढायचे.

असे म्हणतात की एके दिवस बाल दिगंबर अवस्थेतील गजानन महाराज अक्कलकोटला स्वामी समर्थाच्या आश्रमात पोहचले. तेव्हा अक्कलकोट स्वामी भक्तांना उपदेश करीत असताना त्यांनी बाल गजानन यांना ओळखून सिध्दपुरुष होण्याचा आशिर्वाद दिला. तेव्हा बाल गजानन स्वामींच्या आश्रमी राहिले. अशा प्रकारे स्वामींनी बाल गजानन यांना आध्यात्मिक ज्ञानाचे धडे दिले आणि नंतर त्यांना नाशिकला देव मामलेदारांकडे



जाण्यास सांगितले व त्यानंतर आकोटला नरसिंग महाराजाकडे आणि तेथून शेगावला जाऊन भक्तांचा उध्दार करावा व तेथेच देह सोडावा असे सांगितले.

गजानन महाराज यांची सहा फुटी सडसडीत शरीरयष्टी, रापलेला तांबूस वर्ण, तुरळक दाढी व केस, वस्त्रविहीन शरीर आणि गुडघ्यापर्यंत पोचणारे हात अशी देहचर्या होती. पाय अनवाणी आणि महाराजांची अशी मूर्ती अचानक एखाद्याच्या घरात लगबगीने जात असे. अंगणात किंवा ओसरीवर मुक्काम करत मनाला पटेल इतक्या दिवस राहून पुढील मुक्काम गाठत असे.

गजानन महाराजांनी देवाकडे जाण्याचे तीन मार्ग सुचविले ते म्हणजे कर्ममार्ग, भक्तिमार्ग आणि योगमार्ग. हे तीन मार्ग जीवात्म्याला आत्मज्ञान प्राप्त करून देतात असे महाराजांनी सांगितले. महाराज आपल्या भक्तांसोबत वारीच्या निमित्ताने दरवर्षी पंढरपूर येथे जात असत. तसेच नाशिक-त्र्यंबकेश्वर येथेही नित्यनेमाने जात होते.

ब्रह्माचे पूर्णपणे ज्ञान झालेले महाराज जीवनमुक्त संत होते म्हणूनच ते बहुशः दिगंबर अवस्थेतच असत. कोणी अंगावर शाल पांघरल्यास मनात असेल तोपर्यंत ठेवत नंतर फेकून देत असत. महाराजांनी पादत्राणे कधीच वापरली नाहीत. त्यांना कोणतीही उपाधी पटत नसत. महाराज हे परमहंस संन्यासी होते आणि त्यांनी स्वतःच्या ह्या संन्यासाश्रमाचा उच्चार अनेक वेळा करुनही दाखविला आणि त्याचप्रमाणे त्यांनी परमहंस संन्याश्याच्या रुपाने आपल्या भक्तांना दर्शन ही दिले. या सर्वांचा श्रीगजाननविजय ह्या पोथीमध्ये उल्लेख आलेले आहेत.

भक्तांचा उद्धार करुन जेव्हा गजानन महाराजांना कळले की त्यांच्या अवतार समाप्तीची वेळ आली आहे तेव्हा त्यांनी हरी पाटलासोबत पंढरीला जाऊन देवाकडे विरह सहन होत नसल्याचे म्हटले. त्यांचा मानस पंढरीलाच समाधी घेण्याचा होता परंतु विठ्ठलाच्या आज्ञेने त्यांनी शेगावलाच समाधी घेण्याचे ठरविले. ऋषिपंचमीचा पुण्यदिनी ही त्यांनी भक्त हजर असताना समाधी घेतली. समाधी घेण्यापूर्वी महाराजांना सुवासिक द्रव्ये लावून अभ्यंग स्नान घालण्यात आले होते तसेच सुवासिनींनी त्यांची पूजा करून मंगलारती ओवाळली होती.

समाधीच्या मिरवणुकीत गजानन महाराजांचे भक्त सहभागी झाले होते आणि भक्तांनी श्रृंगारित रथात ठेवलेल्या महाराजांच्या देहावर अबीर, गुलाल, फुले, तुळशी आणि पैसे उधळले. संपूर्ण शेगावातून मिरवणूक पहाटे मंदिरात आल्यावर महाराजांवर पुन्हा अभिषेक करण्यात आले.

त्यांचा देह शास्त्रात सांगितल्यानुसार उत्तराभिमुख असा समाधीच्या जागी ठेवण्यात आला. अखेरची आरती ओवाळली गेली आणि मीठ, अर्गजा, अबीर ह्यांनी भरली. सर्व भक्तांनी एकच जयजयकार केला, "जय गजानना | ज्ञानांबरीच्या नारायणा | अविनाशरूपा आनंदघना | परात्परा जगत्पते ||" आणि शिळा लावून समाधीची जागा बंद केली गेली.

महाराजांनी ८ सप्टेंबर १९१० रोजी ऋषिपंचमीच्या दिवशी शेगाव येथे समाधी घेतली. म्हणून महाराजांचे भक्त ऋषीपंचमी हा दिवस त्यांची पुण्यतिथी म्हणून पाळतात.

गजानन महाराज यांचे जीवन वर्णन करणारा ग्रंथ श्री. दासगणू महाराज यांनी लिहिला. या ग्रंथाचे नाव "श्री गजानन विजय" असे आहे.

श्री गजानन महाराजांचे मंदिर शेगावाच्या मधोमध असून मंदिर काळ्या पाषाणाचे आहे. श्रींची समाधी मंदिराच्या गुहेत असून वरच्याबाजूला राम, लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्तीची स्थापल्या आहेत. पंढरपूर येथे प्रतिवर्षी शेगावहून आषाढी वारीला गजानन महाराजांची पालखी जाते.

'गण गण गणात बोते'हा मंत्र शेगावचे संत गजानन महाराज म्हणत असत. तर काही गणी गण गणांत बोते असे ही जप करतात.

भजन मंत्राचा अर्थ या प्रकारे आहे- गणी म्हणजे विचार करणे किंवा लक्षात घेणे. गण म्हणजे जीवात्मा. गणांत म्हणजे बह्माहून वेगळा नसलेला. अर्थात जीव हाच ब्रह्म आहे. बोते म्हणजे जयजयकार करा.

याचा अर्थ जीवात्मा ब्रह्माहून वेगळा नसून त्याचे चिंतन करा. अर्थात 'गण गण गणात बोते', याचा अर्थ 'जीव आणि ब्रह्म हे एकच आहेत आणि त्यांना निराळे समजू नये.'

# पाणी बिल थकबाकी वसुलीसाठी ठाणे महापालिकेची मोहीम तीव्र

## १५ दिवसांत ९.८८ कोटींची वसुली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे(06):** ठाणे महानगरपालिका हद्दीत पाणी बिल थकबाकीदारांवर महापालिकेने कडक कारवाई सुरू केली असून गेल्या 15 दिवसांत (दि. 20 जानेवारी ते 5 फेब्रुवारी 2026) प्रभाग समितीनिहाय मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान तब्बल 9 कोटी 88 लाख 14 हजार 345 रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या कारवाईत पाणीपुरवठा विभागाने थकबाकीदारांवर नळसंयोजन खंडीत करणे, नोटिसा देणे, पंप जप्त करणे आणि पंप रूम सील करणे अशा कठोर उपाययोजना राबविण्यात येत आहे. महापालिका आयुक्त सौरभ



राव यांच्या निर्देशानुसार ही मोहिम राबविण्यात येत असून ती सुरूच राहणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने नमूद केले.

या कारवाईत दिवा येथे 313 नळसंयोजन खंडीत करण्यात आली, 21 पंप जप्त तर 34 पंप रुम सील करण्यात आले असून 324 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कळवा प्रभागसमितीत 70 नळसंयोजने खंडीत करण्यात आली. लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती 134 नळसंयोजने खंडीत करुन एकूण 600 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. मुंब्रा प्रभाग समितीत 236 नळसंयोजने खंडीत, 181 पंप जप्त करुन 41 पंप सील करण्यात आले असून 3736 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. नौपाडा कोपरी प्रभाग समिती हद्दीत 245 नळसंयोजने खंडीत करुन 370 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. उथळसर प्रभाग समिती हद्दीत 71 नळसंयोजने खंडीत करण्यात आली. वर्तकनगर प्रभागसमितीत 4 नळसंयोजने खंडीत करुन 26 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तर वागळे प्रभाग समितीमध्ये 1 नळसंयोजन खंडीत करण्यात आले आहे. एकूण 1074 नळसंयोजन खंडीत करण्यात आली. तर 202 पंप जप्त, 75 पंप रुम सील करण्यात आले असून एकूण 5056 जणांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

### प्रभाग समितीनिहाय करण्यात आलेली वसुली

**माजिवडा मानपाडा प्रभाग समिती : रु. 2,16,32,842**

**नौपाडा कोपरी प्रभाग समिती : रु. 1,57,51,012**

**कळवा प्रभाग समिती : रु 1,22,27,292**

**वर्तकनगर प्रभाग समिती रु. : 1, 14,07,893**

**उथळसर प्रभाग समिती रु. 1,09,89,498**

**दिवा प्रभाग समिती : रु 75,54,375**

**लोकमान्य/सावरकर नगर प्रभाग समिती : रु 69,77,735**

**मुंब्रा प्रभाग समिती : रु. 48,60,575**

**वागळे प्रभाग समिती : रु. 56,23,564**

**याशिवाय नागरी सुविधा केंद्र व इतर माध्यमांतून रु. 17,89,559**

इतकी वसुली करण्यात आली. थकबाकीदारांविरुद्ध ही मोहीम पुढेही सुरू राहणार असून नागरिकांनी पाणी बिल वेळेत भरून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# उत्पन्न वाढीसाठी एसटी बसेस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवा

## - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** "बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील, असे परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मंत्रालयातील दालनात आयोजित उत्पन्नवाढ आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल तर ही वाढ टिकणार नाही. त्याचबरोबर, प्रवाशांना ताटकळत ठेवणे म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणे आहे.

दैनंदिन प्रवासात बसेस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, अशा तक्रारी असतात. यासाठी आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी.

प्रत्येक वेळेवर सुटणारी बस म्हणजे



वाढत्या उत्पन्नाकडे जाणारे एक पाऊल आहे. वक्तशीरपणाचा थेट संबंध महसुलाशी आहे. वारंवार होणाऱ्या उशिरामुळे हक्काचा प्रवासी खाजगी पर्यायांकडे वळतो, ही बाब गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

एसटीचा वाढता दैनंदिन खर्च लक्षात घेता, उत्पन्नवाढीसोबतच काटकसरीचे धोरण काटेकोरपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध देखभाल, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि व्यवस्थापनातील शिस्त यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. वक्तशीरपणा हीच एसटीची ओळख ठरली पाहिजे, यादृष्टिने एसटी प्रशासनाने सज्ज होण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

प्रवाशांचा विश्वास जपणारी, वेळेवर धावणारी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होणारी एसटी, हाच पुढील वाटचालीचा मंत्र असल्याचेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# रुग्णवाहिकेसाठी झुंजणारा सामान्य माणूस

"ए बाजूला घ्या रे गाड्या! कानाखाली वाजवली तर सरळ चालंल बघा... ती सायरन ऐकू येत न्हाय का तुम्हाला? का मढं झाल्यावरच रस्ता देणार?"

रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या त्या सडपातळ, टपोरी दिसणाऱ्या पोराच्या हातातला लाकडी दांडा एका महागड्या कारच्या बॉनेटवर 'दणकन' आदळला. त्याचा अवतार बघून एसी कारमधल्या साहेबांची पण घाबरून गाळण उडाली.

दुपारची वेळ. शहरातला मुख्य रस्ता. उन्हाचा तडाखा आणि गाड्यांच्या धुराने जीव गुदमरत होता. ट्रॅफिक इतकं जाम होतं की मुंगीला सुद्धा वाट काढायला अर्धा तास लागेल. या सगळ्या गोंधळात, मागून एक जीवघेणा आवाज येत होता - 'टी... टी... टी...'

एक रुग्णवाहिका गेल्या पंधरा मिनिटांपासून एकाच जागेवर उभी होती. आतमध्ये कुणाचा तरी जीव शेवटच्या घटका मोजत होता, पण बाहेरच्या निष्ठुर ट्रॅफिकला त्याचे काहीच देणेघेणे नव्हते. लोक हॉर्न वाजवत होते, एकमेकांना शिव्या घालत होते, पण इंचभरही जागा सोडायला कुणी तयार नव्हतं.

तेवढ्यात, कर्कश आवाजात एक जुनी पल्सर बाईक थेट विरुद्ध दिशेने आली आणि रुग्णवाहिकेच्या समोर आडवी उभी राहिली. त्यावरून एक विशी-बाविशीचा पोरगा उतरला. फाटकी जीन्स, विस्कटलेले केस, गळ्यात रुद्राक्षाची माळ आणि डोळे रडून लाल झालेले... दिसायला एकदम गल्लीतला टपोरी गुंड वाटत होता तो. त्याचं नाव बंटी.

बंटीने गाडीवरून उतरताच बाजूला




पडलेला एक जाड लाकडी दांडा उचलला आणि तो थेट गाड्यांच्या दिशेने धावला.

"ओ हिरो! दिसत नाय का मागं? ती गाडी हिकडं घे..." त्याने एका रिक्षावाल्याला दम भरला.

पुढे जाऊन त्याने एका इनोव्हाच्या काचेवर जोरजोरात थापा मारायला सुरुवात केली. "काच खाली घे रे! तुला एसीची हवा खायची हाय, पण तिथं कुणाचा जीव चाललाय त्याचं काय? गाडी कडेला घेतो का फोडू थोबाड?"

त्याची भाषा अत्यंत गावठी आणि शिवराळ होती. वागणं तर एखाद्या सराईत गुन्हेगारासारखं होतं. लोक घाबरले. "कुठला गुंड आहे हा? दिवसाढवळ्या दादागिरी चाललीय!"

लोकांनी आपापले मोबाईल काढले. व्हिडिओ शूटिंग सुरू झालं.

कुणीतरी ओरडलं, "अरे याला पोलिसात द्या, ट्रॅफिक सोडवायचं सोडून हा तर अजून राडा करतोय."

बंटीला कशाचीच पर्वा नव्हती. तो वेड्यासारखा धावत होता. जो गाडी बाजूला घेत नव्हता, त्याच्या गाडीवर दांडा आपटत होता. लोकांच्या मनात त्याच्याबद्दल प्रचंड राग आणि तिरस्कार निर्माण झाला होता. एक सुसंस्कृत माणूस म्हणाला, "हेच तर आपल्या देशाचं दुर्दैव आहे, असे अशिक्षित गुंड रस्त्यावर माज करतात."

पण बंटीच्या त्या 'रुद्रावतारा'मुळे एक गोष्ट घडली. भीतीपोटी का होईना, लोक गाड्या कडेला घेऊ लागले. जी वाट अर्धा तास बंद होती, ती पाच मिनिटात मोकळी झाली. रुग्णवाहिकेच्या चालकाने ॲक्सिलरेटर दाबला आणि सायरन वाजवत ती गाडी सुसाट निघून गेली.

रुग्णवाहिका नजरेआड होताच, रस्त्यावरचा तो 'वाघ' अचानक शांत झाला. त्याच्या हातातला दांडा गळून रस्त्यावर पडला. मगाशी शिव्या देणारा, गाड्या फोडायला धावणारा बंटी, रस्त्याच्या दुभाजकावर जाऊन बसला आणि दोन्ही गुडघ्यांमध्ये डोकं घालून लहान लेकरासारखा ढसाढसा रडू लागला.

त्याचं ते रूप बघून लोक गोंधळले. जो मगाशी राक्षसासारखा वागत होता, तो आता असा का रडतोय?

तेवढ्यात तिथे ट्रॅफिक पोलीस आणि पोलीस व्हॅन आली. लोकांनी लगेच तक्रार केली, "साहेब, पकडा याला! याने गाड्यांच्या काचा फोडल्यात, लोकांना धमकावलंय. आमचे व्हिडिओ पुरावे आहेत."

एका हवालदाराने जाऊन बंटीच्या खांद्यावर हात ठेवला. "बंट्या... उठ रं."

बंटीने अश्रूंनी माखलेला चेहरा वर केला. इन्स्पेक्टर साळवींनी त्याला ओळखलं होतं.

इन्स्पेक्टर साळवी जमावाकडे वळले. त्यांचा आवाज जड झाला होता.

"तुम्ही सगळे ज्याला गुंड समजताय ना, ज्याचे व्हिडिओ काढून तुम्ही व्हायरल करताय ना... तो गुंड नाहीये."

लोकांचा गोंधळ वाढला.

इन्स्पेक्टर पुढे बोलले, "गेल्या आठवड्यात... याच चौकात असाच ट्रॅफिक जॅम झाला होता. एक रुग्णवाहिका अशीच अर्धा तास अडकून पडली होती. त्या रुग्णवाहिकेत या बंटीची आई होती. हार्ट अटॅक आला होता तिला. वेळेवर हॉस्पिटलला पोहोचता आलं नाही, म्हणून त्याच्या आईने त्या ट्रॅफिकमध्येच तडफडून प्राण सोडले. हा पोरगा रुग्णवाहिकेच्या खिडकीतून लोकांना हात जोडत होता, रस्ता मागत होता, पण कुणीच ऐकलं नाही."

हे ऐकताच जमावात स्मशानशांतता पसरली. मोबाईलवर शूटिंग करणारे हात खाली झाले.

इन्स्पेक्टरचा कंठ दाटून आला, "त्या दिवशी आपल्या आईच्या मृतदेहाशेजारी बसून या पोराने एक शपथ घेतली होती की, 'माझी आई गेली, पण यापुढे या चौकात ट्रॅफिकमुळे कोणाची आई मरू देणार नाही.' आज त्याने त्याची शपथ पूर्ण केली. त्याची पद्धत चुकीची होती, कायदा हातात घेतला त्याने... पण त्याचा हेतू 'जीव वाचवणे' हा होता. जो माणुसकीचा धर्म आपण सुशिक्षित लोकांनी विसरला, तो या अशिक्षित पोराने निभावला."

बंटी अजूनही डिव्हायडरवर बसून रडत होता. त्याला पोलिसांच्या कारवाईची भीती नव्हती, त्याला लोकांच्या मारहाणीची भीती नव्हती. त्याला फक्त समाधान होतं की, आज कोणाची तरी आई, कोणाचा तरी बाप वेळेवर हॉस्पिटलला पोहोचला होता. त्या दिवशी त्या चौकातल्या शेकडो सुशिक्षित लोकांच्या माना, त्या एका 'टपोरी' पोरासमोर लाजेने झुकल्या होत्या.

रुग्णवाहिकेला रस्ता द्या, कारण त्यातला प्रत्येक सेकंद कुणासाठी तरी जीवन-मृत्यूचा प्रश्न असतो.

# ज्येष्ठ नागरिकांना बसप्रवासासाठी डिजिटल ओळखपत्रासाठी अर्ज स्वीकृतीला सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,(06) :** ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसमधून ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना प्रवासासाठी डिजिटल ओळखपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी नमुना अर्ज वितरित करून तो भरून आवश्यक कागदपत्रांसह जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सध्या ठाणे स्थानक, कोपरी आगार, आनंदनगर व वागळे आगार येथे अर्ज स्वीकृती सुरू करण्यात आली आहे.



ज्येष्ठ नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ पासून वृंदावन सोसायटी, लोकमान्यनगर टर्मिनस, पवारनगर टर्मिनस व धर्मवीर चौक येथेही अर्ज स्वीकृती सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या केंद्रांवर सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत अर्ज स्वीकारले जाणार असून नागरिकांनी नमुना अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

डिजिटल ओळखपत्रानुसार सदर योजना १ मार्च २०२६ पासून सुरू करण्याचे नियोजन आहे. दरम्यान, ओळखपत्रासाठी आलेल्या अर्जांचा विचार करून सर्व अर्जदार ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र मिळेपर्यंत जुन्या पद्धतीप्रमाणे मोफत प्रवासाची सवलत सुरू राहणार आहे याची नोंद ज्येष्ठ नागरिकांनी घेवून परिवहन सेवेचे सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

# भविष्यवेध



शनिवार
०७ फेब्रुवारी २०२६

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मीन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

# चार अल्पवयीन मुले भिवंडीतून बेपत्ता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडीत गेल्या तीन दिवसात ४ अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये तीन मुलींसह एका मुलाचा समावेश आहे. पहिल्या घटनेत नारपोली पोलिस ठाणे हद्दीत यांच्या १३ वर्षीय मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय तिच्या वडिलांनी व्यक्त केला. याप्रकरणी त्यांनी नारपोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. दुसऱ्या घटनेत १५ वर्षाच्या मुलाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन २ फेब्रुवारीला पळवून नेले. तिसऱ्या घटनेत ३ फेब्रुवारीला १४ वर्षीय मुलगी किराणा दुकानातून सकाळी ९ वाजता घरी नाश्ता करण्यासाठी गेली. मात्र परत ती दुकानात परतलीच नाही. तिचा बराचवेळ शोध घेऊनही ती न सापडल्याने मुलीला फूस लावून अपहरण केल्याच्या संशयावरून दिलेल्या तक्रारीवरून कोनगाव पोलिस तपास करत आहेत. चौथ्या घटनेत १५ वर्षीय मुलगी घरात मेडिकलमध्ये औषधे घ्यायला जाते, असे सांगून घरातून गेली. त्यानंतर ती घरी परतली नाही.

# कल्याण–डोंबिवलीत प्रगत आरोग्य सुविधांना चालना

## रुग्णालये वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिपत्याखालील बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण (प.), शक्तीधाम रुग्णालय, कल्याण (पू.) तसेच गौरीपाडा रुग्णालय, कल्याण (प.) ही रुग्णालये रुग्णसेवा देण्यासाठी सामंजस्य कराराच्या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबरनाथ यांना संलग्न करण्यात येणार आहेत. याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णयानुसार ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्न ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रुग्णालयीन प्रशिक्षण मिळावे, यासाठी केडीएमसीची वरील तीन रुग्णालये तात्पुरत्या स्वरूपात किमान सात वर्षांसाठी किंवा महाविद्यालयाची स्वतःची स्वतंत्र इमारत तयार होईपर्यंत वापरण्याची विनंती अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबरनाथ यांनी केली होती.

या प्रस्तावानुसार प्रथम टप्प्यात बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण (प.) हे रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात घेण्यात येणार असून येथे अतिदक्षता विभाग (ICU) व अत्यावश्यक सेवा तात्काळ कार्यान्वित केल्या जाणार आहेत. त्यानंतर आवश्यक अध्यापकीय, तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यावर गौरीपाडा रुग्णालयातील इमारत ताब्यात घेऊन स्त्रीरोग व बालरोग विभाग (Gynaecology व Paediatrics) सुरू करण्यात येणार आहेत. अंतिम टप्प्यात शक्तीधाम रुग्णालय, कल्याण (पू.) येथील इमारतीच्या आरक्षणात बदल झाल्यानंतर ते रुग्णालय ताब्यात घेऊन इतर वैद्यकीय विभाग कार्यान्वित केले जाणार आहेत.

ही सर्व रुग्णालये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथशी संलग्न झाल्यानंतर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ सेवा, प्रगत उपचार पद्धती तसेच अतिदक्षता विभागाच्या सुविधा केडीएमसी क्षेत्रातील नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. यामुळे कल्याण–डोंबिवली परिसरातील सार्वजनिक आरोग्य सेवांना मोठी चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

हा प्रस्ताव राज्य शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात येणार असून, शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर व आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येणार आहे.

# केडीएमसीत अर्थसंकल्पीय हालचालींना वेग

## महापालिका अधिकाऱ्यांना दिली विकासकामांची यादी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : महापौर, उपमहापौरांच्या निवडणुकीनंतर आता नगरसेवकांना पुढील महिन्यात होणाऱ्या महापालिका अर्थसंकल्पाचे वेध लागले आहे. स्वतःच्या पॅनलमध्ये विकासकामांसाठी किती कोटींचा निधी मिळणार, त्यानुसार कामांबाबतचे पत्र पालिका अधिकाऱ्यांना देण्याचे काम सुरू आहे.

पालिकेच्या डोंबिवली पश्चिमेतील पॅनल २२ मधील डीपी रस्त्यांची अंदाजपत्रकामध्ये कामे घेण्यासाठी स्थानिक नगरसेवकांनी पालिकेला पत्र दिले आहे. त्यामध्ये उमेशनगर ते रिंग रोडपर्यंत डीपीडीसीप्रमाणे डीपी रस्त्याचे सीमांकन करून काम करणे. 'एमएसईडीसीएल'चे केबल शिफ्टिंग आणि ट्रान्स्फॉर्मर शिफ्टिंग करून घेणे. रस्त्याच्या दुतर्फा पावसाळ्यात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी भुयारी गटारे तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी बस स्टॉप उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. सद्गुरू अपार्टमेंट, महालक्ष्मी चौक, मांगल्य संकुल ते रिंग रोडपर्यंत रस्ता, डीपीडीसीप्रमाणे डीपी रस्ता बनविण्यासाठी आवश्यक नऊ कोटींचा निधी, महालक्ष्मी चौक ते रेणुका अपार्टमेंट नाल्यापर्यंतचा डीपी रस्ता करून काम करणे. त्यात 'एमएसईडीसीएल'चे केबल शिफ्टिंग आणि ट्रान्स्फॉर्मर शिफ्टिंग करून घेणे (९ कोटी), महालक्ष्मी चौक ते उमया कॉम्प्लेक्सपर्यंत डीपीप्रमाणे रस्ता (५ कोटी), श्रीधर म्हात्रे चौक सुभाष रोड ते ह प्रभाग कार्यालय चौक रस्ता बनविणे (१० कोटी), प्रगती स्काय लाईन, रागाई मंदिर ते सुभाष रोड त्रिसंगम सोसायटी रस्ता (१५ कोटी), गंगेश्वर टॉवर ते रिंग रोडपर्यंत डीपीप्रमाणे रस्ता (१५ कोटी), विजय सोसायटीअंतर्गत गटारे व कॉंक्रिटीकरण करून पायवाट बनविणे (२ कोटी), देवीचा पाडा साईबाबा मंदिर रोड ते दीडशे फूट रिंग रोड (९ कोटी), देवीचा पाडा स्मशानभूमीचे नूतनीकरण करून एलपीजी शवदाहिनी उभारणे (४.५ कोटी), कुंभारखाण राजू नगर, गणेश घाट येथे सुशोभीकरण करणे आदी कामांची मागणी केली आहे.

# धूळ नियंत्रणासाठी रस्ते व दुभाजक स्वच्छता

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या धुळीच्या त्रासावर मात्रा म्हणून धुळीत माखलेल्या दुभाजकांसह रस्त्यांची पाण्याने धुलाई करायला केडीएमसीने सुरुवात केली आहे. पाण्याच्या छोट्या टँकरसह फॉगर मशीनचा वापर प्रभागनिहाय सुरू केला आहे. बुधवारी रात्री कल्याण पूर्वेकडील पूना लिंक आणि मलंग रोडवरील दुभाजक आणि रस्ते पाणी मारून धुळीतून मुक्त करण्यात आले. शहरात सद्यःस्थितीला धूळधाणीमुळे नागरिकांचा श्वास कोंडत असून सर्दी, खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असल्याचे वृत्त 'लोकमत'ने ३१ जानेवारीला प्रसिद्ध केले होते. यावर कल्याणमधील सहयोग सामाजिक संस्थेने आयुक्त अभिनव गोयल यांना निवेदन पाठवून 'आम्ही धुळीच्या शहरात राहतो का?' असा खरमरीत सवाल केला होता.

# भिवंडीत गोविंद नगर येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत गोविंद नगर येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू करण्यात आले आहे. या आरोग्य मंदिराच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा, तपासण्या तसेच विविध आजारांवरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संदर्भात भिवंडी महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर तसेच वैद्यकीय आरोग्य विभाग, भिवंडी महानगरपालिका यांच्या वतीने गोविंद नगर व आसपासच्या परिसरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा. सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सुलभ व प्रभावी व्हाव्यात या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात येत असून नागरिकांनी याचा जास्तीत जास्त उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.






# केडीएमसी महापौरांनी अधिकाऱ्यांसमवेत केली महापौर निवासाची पाहणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीनंतर महापौरांची निवड देखील झाली आहे. मात्र महापौरांसाठी महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या महापौर निवासस्थानाची दुरावस्था झाली आहे. गेली कित्येक वर्षे हा बंगला बंद असल्याने वाळवी लागली आहे. या महापौर निवासस्थानाची आज केडीएमसी महापौर हर्षाली चौधरी थविल यांनी शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त शहर अभियंता जगदीश कोरे, प्रशांत भागवत, शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे यांच्यासह पाहणी केली.



### महापौर निवासस्थानाची होणार लवकरच डागडुजी

कल्याण पश्चिमेतील आधारवाडी जेल परिसरात २०१० साली जनतेचे लाखो रुपये खर्च करून हे महापौर निवासस्थान बांधण्यात आले होते. मात्र, या निवासस्थानाला जाण्यासाठी रस्ता नसल्याने तसेच इतर वादामुळे हे निवासस्थान सुरुवातीपासूनच चर्चेत राहिले. बांधकामानंतर अनेक वर्षे हा बंगला वापराविना ओस पडून होता. यानंतर पुन्हा लाखो रुपये खर्च करून बंगल्याची डागडुजी करण्यात आली. मात्र, तत्कालीन महापौरांनी केवळ बंगल्याची पूजा करून त्यामध्ये वास्तव न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पुन्हा एकदा

### केडीएमसी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे करदात्या नागरिकांच्या पैशांचा चुराडा

हा बंगला वापरात आला नाही. कोरोना काळापासून तर हा बंगला पूर्णपणे बंद अवस्थेत असून, देखभालीअभावी त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

सध्या बंगल्यातील संपूर्ण लाकडी फर्निचर खराब झाले असून, अनेक ठिकाणी वाळवीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. नियमित देखभाल व संरक्षण न केल्यामुळे महापौर निवासस्थानाची मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली आहे. केडीएमसी प्रशासनाने या बंगल्याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने पुन्हा एकदा दुरुस्तीसाठी जनतेच्या लाखो रुपयांची उधळपट्टी होणार आहे. या या निवासस्थानाची पाहणी करण्यात येऊन लवकरच या निवासाच्या डागडुजीचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे शहर अभियंता अनिता परदेशी यांनी सांगितले.

दरम्यान महापौर हर्षाली चौधरी थविल या सद्ध्या मोहने येथे भाड्याच्या घरात राहत असून, महापौर निवासस्थानाची डागडुजी लवकर झाल्यास कल्याणमध्ये महापौर निवासस्थानी राहून नागरिकांच्या कामासाठी जास्तीत जास्त वेळ देता येईल.



# कल्याण-डोंबिवलीत बेशिस्त रिक्षाचालक वाढले

## दोन दिवसांतील वेगवेगळ्या घटनांत दोघे जखमी, तर एकाचा मृत्यू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली, ता. ६**

कल्याण-डोंबिवलीत दिवसेंदिवस बेशिस्त, मुजोर रिक्षाचालकांची संख्या वाढत असल्याचे स्थानिकांकडून वारंवार सांगण्यात येत आहे. मागील दोन दिवसांच्या कालावधीत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये रिक्षांनी दिलेल्या धडकेत, अपघात होऊन झालेल्या घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले. तर दुसऱ्या घटनेत रिक्षाचालकाच्या बेशिस्तीमुळे एका प्रवासी महिलेला आपला जीव गमवावा लागला असल्याचे समोर आले आहे. मानपाडा पोलिस ठाण्यात जय प्रकाश यादव यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार रिक्षाचालक प्रभण्णा जिरोल (वय ४२) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवारी (ता. ३) रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान कल्याण-शिळफाटा हद्दीतील रस्त्यावरून प्रभण्णा हे रिक्षा प्रवासी नेत असताना घेऊन चालले असताना त्यांचा रिक्षावरील ताबा सुटला आणि रिक्षा वेगाने पलटी होऊन रस्त्याच्या कडेला जाऊन आपटली. यामध्ये रिक्षातील प्रवासी आशीष चव्हाण यांना गंभीर दुखापत झाली तर तक्रारदाराची बहीण मीनल यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

**कोळसेवाडी परिसरात दुसरी घटना**

चिंचपाडा भागात राहणाऱ्या जान्हवी सौरे (वय २३) या रिक्षाच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कोळसेवाडी पोलिसांनी अज्ञात रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जान्हवी या कुटंबीयांसह रिक्षेने कल्याण रेल्वे स्थानकाकडून घरी जात असताना एका दुसऱ्या रिक्षाचालकाने जान्हवी बसलेल्या रिक्षेला धडक दिल्याने जान्हवी जखमी झाल्या.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणार झाड तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एन.आर.सी. लि. | स.नं. १०, स.नं. ११/३, स.नं. १२, स.नं. १३/१, २ए, २ बी, २सी, ३, स.नं. १४/१, २, ३, ४, ५,स.नं. १५/१, २, ३,४,५ए,५ बी, ६, ७, ८, ९, १०, ११,१२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, स.नं. १६/१, २, स.नं. १७/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८ए, ८ बी ,९, १०, ११, १२, १३, १४, स.नं. १८/१, २ए, २ बी, ३,४, स.नं. १९/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, स.नं. २०/१, २, ३, ४ स.नं. २१/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ए, १२बी, १३,१४,१५,१६, १७ ए, १७ बी, स.नं. २३/१, २, ३ए, ३ बी ३ सी, ३डी, ३ई, ३ एफ ४, ५, ६, ७ स.नं. २४/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८ मौजे-आंबिवली | ०१ | विकासकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत.

तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/ मुका/९२१**
**दिनांक :- ०६/०२/२०२६**

**सही/-**
**(संजय जाधव)**
**वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
फेरनिविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या मानसोपचार विभागासाठी ELECTRO CONVULSIVE THERAPY (ECT) MACHINE खरेदी करणेसाठी ऑन लाईन ई –टेडरिंग पद्धतीने फेरनिविदा मागविण्यात येत आहे. फेरनिविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.०९/०२/२०२६ ते दि.१७/०२/२०२६ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.१७/०२/२०२६ रोजी १६.३० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्वीकारण्यात येतील. दि.२३/०२/२०२६ रोजी १६.०० वाजता स्वीकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा /पिआरओ/अधिष्ठाता/११५९/२०२५-२६ सही/-
दि.०६.०२.२०२६ अधिष्ठाता
**plsvisitourofficialweb-site** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व
**www.thanecity.gov.in** राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## नाव बदल सूचना

**मी इशू रामभाव नागरे**,राहणार ग्रीन पर्ल इस्टेट, वैतरणा रोड, मोदलपाडा, दहिसर,

या जाहीर सुचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येत आहे की, **माझे जुने नाव इशू रामभाव नागरे** असे होते. ते मी बदलून **माझे नवीन नाव पाखी रामभाव नागरे** असे ठेवले आहे.सदर नाव बदल महाराष्ट्र शासन **राजपत्र (गॅझेट) क्रमांक M-2092851** मध्ये प्रसिद्ध झालेला आहे.

आजपासून पुढील सर्व शासकीय, शैक्षणिक, कायदेशीर व इतर सर्व नोंदींमध्ये **माझे नवीन नाव पाखी रामभाव नागरे** असे समजण्यात यावे.

**दिनांक :**
**०६ फेब्रुवारी २०२६**

**सही /-**
**पाखी रामभाव नागरे**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाढदिवस साजरा करणार नाही

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 6 :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे यंदा 9 फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत, शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज लावू नये, तसेच वाढदिवसानिमित्ताने कोणताही सोहळा आयोजित करू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे. अजित दादांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र आजही सावरलेला नाही. व्यक्तिशः मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. दादांच्या निधनाने झालेली अपरिमित हानी भरून येणारी नाही. पवार कुटुंबाच्या दुःखात आपण सहभागी आहोत.



अशा या दुःखद परिस्थितीत वाढदिवस साजरा करणे, सोहळे-समारंभ करणे मला उचित वाटत नाही. त्यामुळेच परिस्थितीचे गांभीर्य आपण जपू या असे आवाहन श्री. शिंदे यांनी केले आहे. माझ्या वाढदिवसानिमित्ताने कुणीही पुष्पगुच्छ आणू नयेत, होर्डिंग्स लावू नयेत, तसेच कोणताही समारंभ, कार्यक्रम आयोजित करू नयेत, अशी विनंती उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली आहे.

## माळशेज घाटात राष्ट्रीय महामार्गाचे काम जलद

### बाधित शेतकऱ्यांना मोबदला नाही



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** कल्याण-माळशेज-नगर राष्ट्रीय महामार्गावरील माळशेज घाट परिसरात रस्ता रुंदीकरण व कॉंक्रीटीकरणासाठी १४ किलोमीटरपेक्षा अधिक लांबीचा रस्ता एकाच वेळी खोदण्यात आल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर लोकमित्र रमेश हिंदुराव, सुभाष आप्पा घरत तसेच चंदर पारधी यांनी सातत्याने पाठपुरावा व आंदोलनाची भूमिका घेतल्याने अखेर प्रशासनाला याची दखल घ्यावी लागली असून, रस्त्याच्या कामातील काही भाग जलदगतीने पूर्ण करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रीय महामार्ग विभागाने सादर केले आहे.

या संदर्भात नोव्हेंबर महिन्यात सुभाष घरत यांनी कार्यकारी अभियंता, राज्यमार्ग विभाग, ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. त्यानंतर १२ डिसेंबर रोजी मुरबाड तहसील कार्यालयासमोर रमेश हिंदुराव यांनी उपोषण केले होते. त्या वेळी उपविभागीय अभियंत्यांनी १० दिवसांत ७ किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते.

या पार्श्वभूमीवर २० डिसेंबर रोजी रमेश हिंदुराव, सुभाष घरत यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाची दखल घेत कार्यकारी अभियंत्यांनी ठेकेदाराला रस्त्याचे काम तातडीने व जलदगतीने पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले.

यानंतर ठेकेदाराने कामाच्या गतीत लक्षणीय वाढ करत अवघ्या १५ ते २० दिवसांत तब्बल १४ किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण केले असल्याचे लेखी पत्र कार्यकारी अभियंता, राज्यमार्ग विभाग, ठाणे यांनी लोकमित्र रमेश हिंदुराव, माजी जि. प. सदस्य सुभाष घरत ( ठाणे) व झाडघरचे माजी सरपंच चंद्रकांत पारधी यांना दिले आहे. यामुळे जलद कामाचे अधिकारी व ठेकेदार यांचे कौतुक होत आहे. मात्र, रस्त्याच्या कामामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नसून, बाधित शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला तातडीने अदा करावा, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

> रस्त्याचे काम जवळ जवळ पुर्ण होत आले आहे. रस्ता रुंदीकरणात टोकावडे, वैशाखरे परिसरातील अनेक बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यासाठी शासनाकडे आम्ही भांडत आहोत. शासनाने याची दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना लवकर न्याय द्यावा
>
> **- सुभाष घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य**

## महापौर हर्षाली चौधरी यांच्या प्रयत्नाने अटाळी येथे रस्त्याच्या डांबरीकरणास सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाच्या विशेष निधीतून (मूलभूत सोयी-सुविधा अंतर्गत) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्रमांक ३ मध्ये वाल्मीकी शाळा ते अटाळी गावापर्यंत नवीन डांबरीकरण रस्ता तयार करण्याचे काम प्रत्यक्षात सुरू झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुकर होणार आहे.

दीर्घकाळापासून या रस्त्याची दुरवस्था झाल्याने स्थानिक रहिवाशांना वाहतूक कोंडी, खड्डे आणि पावसाळयात चिखल यांचा त्रास सहन करावा लागत होता. नव्याने करण्यात येणाऱ्या डांबरीकरणामुळे या सर्व समस्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच वडवली येथील उल्हास नदीवरील रस्त्याचे कामही पूर्णत्वाकडे जात असल्याने परिसराच्या विकासाला गती मिळाली आहे. महापौर पद मिळताच अ प्रभाक्षेत्रातील सोयी सुविधांना पालिकेतील अधिकाऱ्यांनी सुरुवात केली असून महापौर पदाची ताकद काय असते हे हर्षाली चौधरी यांनी दाखवून दिले आहे.

या कामासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार, कल्याण लोकसभा श्रीकांत शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तसेच कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर शिवसेना कल्याण शहर प्रमुख रवी पाटील शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे आणि माजी नगरसेवक शिवसेना उपशहर प्रमुख दुर्योधन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कामाला गती देण्यात आली आहे.



### पदभार स्वीकारून दोनच दिवसातच रस्त्याचे काम झाले सुरू

महापौर ॲड. हर्षाली विजय चौधरी-थविल यांच्या अथक प्रयत्नातून व विशेष पाठपुराव्यामुळे निधी मंजूर होऊन हे काम प्रत्यक्षात साकारत आहे. महापौर पद मिळताच अ प्रभाग क्षेत्रातील कामांना चांगली गती मिळाली असल्याने पॅनल क्रमांक ३ मधील नागरिकांना दिलासा मिळणार असून, शिवसेनेने दिलेल्या विकासाच्या वचनपूर्तीचा आणखी एक टप्पा पूर्ण होत असल्याची भावना स्थानिक स्तरावर व्यक्त होत आहे.

## डेटा संरक्षण आणि पारदर्शकता यांचा समतोल आवश्यक

### - मुख्य सचिव राजेश अग्रवाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 6 :** डेटा संरक्षण आणि प्रशासनातील पारदर्शकता यांचा समतोल राखणे आवश्यक असून, नागरिकांचा त्यांच्या डेटावर हक्क आणि नियंत्रण असणे ही लोकशाहीची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

डिजिटल युगात नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सायबर सुरक्षा आणि जबाबदार प्रशासन अधिक बळकट करण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्यावतीने डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण (Digital Personal Data Protection) कायदा (DPDP Act), 2023 आणि त्यासंदर्भातील नियमांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी, कायदेतज्ज्ञ, तंत्रज्ञान व गोपनीयता क्षेत्रातील जाणकारांनी सहभाग घेतला.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सायबर सुरक्षा, डेटा मालकी हक्क आणि डेटा संरक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. DPDP कायद्याच्या अंमलबजावणीनंतर कोणतीही डेटा गळती थेट दंडात्मक कारवाईस कारणीभूत ठरू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

#### मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी DPDP कायद्यामुळे डेटा संकलन, साठवण आणि वापराची पद्धत बदलावी लागेल, असे सांगितले. अनेक प्रणाली गरजेपेक्षा जास्त डेटा गोळा करतात, याकडे लक्ष वेधत त्यांनी जुन्या डेटाबेसचे पुनरावलोकन, डेटा इम्पॅक्ट असेसमेंट आणि मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. विशेषतः मुले, महिला आणि असुरक्षित घटकांच्या डेटाबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

#### जबाबदार डेटा व्यवस्थापन पद्धतीवर भर - सचिव विरेंद्र सिंह

माहिती तंत्रज्ञान सचिव विरेंद्र सिंह म्हणाले की, आरोग्य, शिक्षण, सामाजिक कल्याण, आर्थिक समावेशन यांसारख्या क्षेत्रांत वाढलेल्या डिजिटल सेवांमुळे नागरिकांची वैयक्तिक माहिती, त्याचे संरक्षण आणि योग्य वापर ही महत्त्वाची जबाबदारी बनली आहे. DPDP कायदा हा शासन संस्थांच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल घडवणारा आहे. नागरिकांचा विश्वास ही सार्वजनिक प्रशासनाची खरी ताकद आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने पारदर्शक, नैतिक आणि जबाबदार डेटा व्यवस्थापन पद्धती स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

#### गोपनीयतेचा मूलभूत अधिकार - ॲड. खुशबू जैन

ॲड. खुशबू जैन यांनी DPDP कायद्याची घटनात्मक पार्श्वभूमी स्पष्ट करताना गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले. वैयक्तिक माहिती संमतीशिवाय संकलित करता येणार नाही, तसेच नागरिकांना त्यांच्या डेटाची माहिती, प्रवेश, संमती मागे घेणे व डेटा हटविण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले.

लेगॅसिस टीमच्या सादरीकरणात DPDP कायद्याच्या प्रमुख तरतुदी, डेटा संरक्षण मंडळ, डेटा फिड्युशरी, डेटा प्रिन्सिपल, कन्सेंट मॅनेजर आणि डेटा संरक्षण अधिकारी (DPO) यांच्या भूमिका स्पष्ट करण्यात आल्या. डेटा उल्लंघन झाल्यास जबाबदारी केवळ विक्रेत्यांची नसून संबंधित अधिकारी यांचीही असल्याचे अधोरेखित करण्यात आले.कार्यशाळेला भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेतील तसेच महाआयटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने निबंध स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग, राष्ट्रसेवा दल व अनुबंध संस्था कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून 'सावित्री घरोघरी, ज्योतिबाचा शोध जारी' या विषयावर महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेच्या आयोजनासाठी राष्ट्रसेवा दलाचे सहकारी विशाल जाधव व सुहास कोलते आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चिंतामण भोईर यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या प्रा. सविता पाटील व प्रा. संगीता सोमय्या यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.




## जिल्हा परिषद निवडणूक : प्रचार थांबला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीचा प्रचाराची मुदत गुरुवारी रात्री १२ वाजेपर्यंत होती, मात्र रात्री १० नंतर ध्वनिक्षेपकाची परवानगी नसल्याने खरा प्रचार रात्री १० वाजताच थंडावला. शनिवारी या निवडणुकांसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. तर सोमवारी ९ फेब्रवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

प्रचार संपला असल्याने राजकीय पक्ष व उमेदवारांना मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांसह कुठल्याही माध्यमाद्वारे प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत.

या निवडणुकीत प्रत्येक एक मत जिल्हापरिषदेसाठी तर एक मत पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी द्यावे लागते. त्यामुळे एका मतदाराने दोन मते देणे अपेक्षित आहे.

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी सुरक्षा व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात - मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई दि. 6 :** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. देशभरातून लाखो भाविक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या तयारीस गती देत सुरक्षा, पाणीपुरवठा, भोजन, निवास, वाहतूक, स्वच्छता आदी बाबींची चोख व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी यांनी दिले.

'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमांता बिस्वा सरमा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मंत्रालयात बैठक झाली.यावेळी राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी तथा कार्यक्रमाचे समन्वयक रविंद्र राठोड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, मुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव तुषार राठोड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे कोकण, पुणे, नाशिक विभागाचे आयुक्त, मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबारचे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, परिवहन आयुक्त, महानगरपालिकेचे आयुक्त यांच्यासह संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले की, नागपूर आणि नांदेड येथील कार्यक्रम लाखो भाविकांच्या उपस्थित यशस्वीरित्या झाला आहे. या कार्यक्रमात सिख, सिकलकर,बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकी) संप्रदायासह नागरिकही मोठ्या संख्येने गुरू तेग बहादुर यांचा इतिहासाला उजाळा देण्यासाठी एकत्र येतात. नवी मुंबई येथील कार्यक्रमातही दहा लाख भाविक राज्य तसेच देशातून अपेक्षित आहेत. या अनुषंगाने वाहतुक, स्वच्छता, लंगर, पाणी पुरवठा, मैदान, धर्मशाळा, निवासव्यवस्था, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह, नि:शुल्क शटल बससेवा या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांच्या शहीदीच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमाअंतर्गत शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा, शिक्षण संस्था येथे विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी काढण्यात येते, घोषवाक्य, निबंध स्पर्धा तसेच डॉक्युमेंट्री बनविण्यात येणार आहे. सतिंदर सरताज यांचे भक्तिगीत सिनेमागृहात प्रदर्शीत करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डिजिटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने, जागरण, प्रचार व प्रसार समित्या यांच्यामार्फत गुरू तेग बहादुर आणि त्यांच्या परिवाराच्या शहीदीचा इतिहास जनमानसात पोहोचविण्यात येत आहे.

https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर कार्यक्रमाची संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. नऊ समाज या कार्यक्रमाच्यानिमित्ताने एकत्र येत असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले.

## आयआयटी मुंबईतील विद्यार्थ्याची आत्महत्या

### कुटुंबीयांची तक्रार नाही

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आयआयटी मुंबईतील विद्यार्थी नमन अगरवाल (२१) याच्या आत्महत्येच्या घटनेचा तपास पवई पोलिस करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले आहेत. या प्रकरणी कुटुंबीयांनी तक्रार दिली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र या आत्महत्येचे नेमके कारण शोधण्याची विनंती कुटुंबीयांनी पोलिसांना केली आहे.

पवई पोलिसांनी नमन याचे वर्गमित्र आणि त्याला रुग्णालयात नेण्यास मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अनेकांची चौकशी केली आहे. "त्याच्या वर्गमित्रांनी दिलेल्या माहितीनुसार तो समुपदेशन घेत होता," असेही पोलिसांनी सांगितले. पंचनाम्यादरम्यान त्याच्या खोलीत 'धिस वर्ड इस नॉट फॉर मी' अशी वाक्य असलेली चिठ्ठी सापडल्याची माहिती आहे. सध्या तरी या प्रकरणात घातपात झाल्याचे संकेत नाहीत, असेही पोलिसांचे म्हणणे असून त्याचे वडील रुग्णालयात असून त्याच्या दोन सख्ख्या बहिणींचे (चार्टर्ड अकाउंटंट) जबाब नोंदवले जाणार आहेत.

## कारागृहात जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** "कर्करोग हा जगातील सर्वात गंभीर आणि जीवघेण्या आजारांपैकी एक मानला जातो. दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यु या आजारामुळे होतो, कर्करोगाबाबत जनजागृती वाढावी, वेळेवर त्तपासणी आणि योग्य उपचार व्हावेत यासाठी दरवर्षी 4 फेब्रुवारी रोजी जागतीक कर्करोग दिन साजरा केला जातो. सदर जागतीक कर्करोग दिनाचे औचित्य साधून कारागृहातील दाखल बंद्यांमध्ये जनजागृती व्हावी तसंच कर्करोगाबाबत असलेले गैरसमज दूर करणे, कर्करोगाची लक्षणे, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याची माहित्ती देण्यासाठी नुकताच अलिबाग जिल्हा कारागृहात जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला असल्याची माहिती अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह, वर्ग-2 विशाल बाळासाहेब बांदल यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते झाली उपस्थित मान्यवरांचे स्वागत अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह यांच्यामार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रबोधन सामाजिक सेवा संस्था, अलिबाग डॉ. मिलिंद पाटील, व उज्वल भविष्य सामाजिक संस्था, अलिबाग डॉ.नितीन गांधी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जागतिक कर्करोग दिनाची सुरुवात कशी झाली तसेच या दिवसाचा मुख्य उद्देश, कर्करोगाची लक्षणे, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत बंद्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उज्वल भविष्य सामाजिक संस्था,अलिबाग डॉ.राजाराम हुलबान यांनी बंद्यांना मार्गदर्शन करताना कर्करोगाबाचत समाजात असलेले गैरसमज दूर करणे, कर्करोग हा फक्त शारीरिक आजार नसून तो मानसिक आणि सामाजिक आवाहन ही आहे. या आजारामुळे रुग्णासोबत त्याच्या कुटुंबालाही अनेक अडचणींना सामोरे जावे जागते. या दिवसामागील हेतु म्हणजे समाजात कर्करोगाविषयी जागरुकता वाढवावी. कर्करोगाची वेळेवर ओळख व उपाययोजनांचे महत्व समजावणे, कर्करोगग्रस्त आणि कुटुंबाला मानसिक व सामाजिक आधार देणे योग्य माहिती वेळेवर मिळाल्यास, जागरुकता आणि उपचार मिळाल्यास अनेकांचे जीवन वाचू शकते याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाकरीता अलिबाग जिल्हा कारागृहातील रामहरी कुटे, सुभेदार, सुनिल जाधव, हवालदार, अजय जावळे, सतिश जुंबळे, का. शिपाई तसेच श्रीम. क्रांती कदम, महिला शिपाई इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.






Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024